नि.फौ.ख.क्र.१६९/२०२२
शासन वि. प्रदीप व ईतर
**निशाणी क्र.१९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांची जबानी शपथेवर सुरू :–**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- विठ्ठल सखाराम लोखंडे, |
| माझे वय | :- ४५ वर्षे, |
| व्यवसाय | :- शेती, |
| राहणार | :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी. |

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

मी आरोपींना ओळखतो. ते माझे मित्र आहेत. माझ्या व आरोपींमध्ये केवळ शाब्दीक बोलाचाली झाली होती. आरोपींनी मला मारहाण किंवा शिवीगाळ केली नव्हती. मी गाडीवरून पडल्यामुळे मला मार लागला होता. मी गैरसमजुतीतून तक्रार दिली होती. आता मला तक्रार व छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आले. त्या दोन्हींवर माझी सही आहे. परंतु, त्यातील मजकुर मला आठवत नाही. त्यावरील सहीस अनुक्रमे **निशाणी क्र.२० व २१** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची अनुमती मागितली. त्याप्रमाणे परवानगी देण्यात आली.)**

२) आता मला जबाबमधील अधोरेखित **भाग–अ** वाचुन दाखवण्यात आला. हे मला आठवत नाही की, तो मी पोलीसांना सांगितला होता किंवा नाही. हे मी सांगु शकत नाही की, सदर मजकुर जबाबात कसा आला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीं व माझ्यामध्ये तडजोड झाल्याबाबतची तडजोड पुरसीस नि.१७ वर दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीं व माझ्यात तडजोड झाली असल्याने मी आरोपींना वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझी कोणत्याही आरोपींविरुध्द तक्रार उरलेली नाही, मला ज्यादा पुरावा द्यावयाचा

नि.फौ.ख.क्र.१६९/२०२२
शासन वि. प्रदीप व ईतर
**निशाणी क्र.१९**

नाही, मला पुढे केस चालवावयाची नाही.

**सरतपास पूर्ण.**

**सर्व आरोपींतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. एस. आर. कुऱ्हाडे यांच्या तर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाकारण्यात आला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रृ. नि. स्वि.,
स्वाक्षरीत/-

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.

मानवत.
दिनांक: ०६/०८/२०२६.